**महामहिम भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्या भारताच्या अधिकृत भेटीबद्दल संयुक्त निवेदन (05-06 डिसेंबर 2024)**

05 डिसेंबर 2024

भूतानचे राजे, महामहिम जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आणि भूतानच्या राणी, महामहिम जेटसन पेमा वांगचुक, 05-06 डिसेंबर 2024 दरम्यान भारताच्या अधिकृत भेटीवर आहेत. महामहिमांच्या समवेत ऊर्जा आणि नैसर्गिक संसाधने मंत्री, महामहिम श्री. जेम शेरिंग आणि भूतानच्या शाही सरकारचे वरिष्ठ अधिकारी आहेत.

2. या भेटीदरम्यान, भूतानचे राजे आणि पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय सहकार्याचे संपूर्ण पैलू आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महामहिम भूतानच्या राजांची भेट घेतली.

3. भारत आणि भूतान यांच्यात मैत्री आणि सहकार्याचे अनोखे नाते आहे, ज्यात सर्व स्तरांवर वैशिष्ट्यपूर्ण असे परस्पर सामंजस्य, विश्वास आणि विलक्षण सहकार्य आहे. द्विपक्षीय चर्चा घनिष्ठ मैत्रीच्या भावनेने झाली आणि दोन्ही देशांमधील मजबूत ऐतिहासिक संबंध, सद्भावना आणि सामंजस्य दिसून आले.

4. दोन्ही नेत्यांनी मार्च 2024 मध्ये झालेल्या त्यांच्या शेवटच्या बैठकीपासून झालेल्या महत्त्वपूर्ण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आणि सहकार्याच्या विविध क्षेत्रांचा समावेश असलेल्या नियमित उच्चस्तरीय भेटी आणि सल्लामसलती यांचे स्वागत केले. त्यांनी व्यापार आणि आर्थिक कनेक्टिव्हिटी, पायाभूत सुविधा, ऊर्जा, कौशल्य विकास, शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक वारसा, क्षमता निर्माण, क्रीडा, युवक आदान-प्रदान, डिजिटल अर्थव्यवस्था, ई-मोबिलिटी, अंतराळ तंत्रज्ञान, पर्यावरण संरक्षण आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांचे परस्पर संपर्क या क्षेत्रांसह दोन देशांमधील विस्तारित भागीदारीचे सकारात्मक मूल्यांकन केले.

5. महामहिम राजे आणि भारताच्या पंतप्रधानांनी द्विपक्षीय संबंधांच्या उत्कृष्ट स्थितीबद्दल समाधान व्यक्त केले आणि या अनुकरणीय संबंधांना आणखी दृढ करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. भूतानच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी भारत सरकार करत असलेल्या अमूल्य सहाय्याबद्दल महामहिम राजांनी कौतुक केले.

6. पंतप्रधानांनी भूतानसोबतच्या मैत्री आणि सहकार्याच्या चिरस्थायी बंधांसाठी भारताच्या कायम वचनबद्धतेची पुन्हा पुष्टी केली आणि शाही सरकारच्या प्राधान्यांवर आधारित आणि महामहिमांच्या दृष्टिकोनानुसार भूतानमधील सामाजिक-आर्थिक विकासाला सतत आणि पूर्ण पाठिंबा देण्याचा पुनरुच्चार केला.

7. भूतान पक्षाने 13व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (2024-29) भूतानसाठी विकास सहाय्य वाढवल्याबद्दल आणि RGoB च्या आर्थिक उत्तेजन कार्यक्रमासाठी भारताच्या पाठिंब्याबद्दल भारत सरकारचे आभार मानले.

8. महामहिम यांनी गेलेफू माइंडफुलनेस सिटी विशेष प्रशासकीय क्षेत्रासाठीच्या त्यांच्या दृष्टीकोनाच्या अंमलबजावणीतील प्रगती आणि भारत आणि भूतान दोन्ही नागरिकांच्या आणि प्रदेशाच्या भल्यासाठी या प्रकल्पावर एकत्र कसे काम करू शकतात याबद्दल पंतप्रधानांना सांगितले. पंतप्रधानांनी गेलेफू माइंडफुलनेस सिटी प्रकल्पासाठी भारताच्या सततच्या सहाय्याची हमी दिली, ज्यामुळे भूतान आणि सीमा क्षेत्रांत समृद्धी आणि सुस्थिती येईल आणि दोन्ही देशांमधील आर्थिक आणि गुंतवणूक संबंध आणखी मजबूत होतील.

9. स्वच्छ ऊर्जा सहकार्य हा भारत-भूतान द्विपक्षीय भागीदारीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मार्च 2024 मध्ये पंतप्रधान मोदींच्या भूतान भेटीदरम्यान जारी केलेल्या भारत-भूतान ऊर्जा भागीदारीवरील संयुक्त दृष्टीकोन निवेदनामध्ये स्पष्ट केल्यानुसार परस्पर फायदेशीर सहकार्य मजबूत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी करून, नेत्यांनी भारतीय वित्तपुरवठा आणि ऊर्जा बाजारपेठांमध्ये प्रवेशाद्वारे भारतीय आणि भूतानी संस्थांमधील गैर-जल नूतनीकरणीय ऊर्जेचा समावेश असलेल्या ऊर्जा क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारीतील अलीकडील प्रगतीचा आढावा घेतला.

10. 1020 मेगावॅटचा पुनात्सांगछू-II जलविद्युत प्रकल्प पूर्णत्वास येत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि नजीकच्या भविष्यात तो कार्यान्वित होण्याची अपेक्षा व्यक्त केली. पुनात्सांगछू-I जलविद्‌युत प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या गरजेवर नेत्यांचे एकमत झाले. उभय पक्षांनी जलविद्‌युत क्षेत्रातील सहकार्याच्या महत्त्वाचा आणि जलाशय जल प्रकल्पांसह नवीन प्रकल्पांसाठी तातडीने रूपरेषा अंतिम करून ती पुढे नेण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

11. दररंग, आसाम येथे एकात्मिक चेक पोस्ट सुरू झाल्याबद्दल दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केले, जे पूर्व भूतान आणि आसामच्या लगतच्या सीमावर्ती भागात पर्यटन आणि आर्थिक क्रियाकलापांना चालना देऊ शकते.

12. दोन क्रॉस बॉर्डर रेल्वे लिंक्सची उभारणी आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीला चालना देण्यासह क्रॉस-बॉर्डर कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधा प्रकल्प यासारख्या पूर्वीच्या बैठकांमध्ये मान्य झालेल्या अनेक उपक्रमांमध्ये सातत्याने प्रगती होत असल्याची देखील त्यांनी समाधानपूर्वक नोंद घेतली. द्विपक्षीय व्यापार आणि वाणिज्य आणखी सुधारण्यासाठी अलीकडेच घेतलेल्या निर्णयांची उभय पक्षांनी नोंद घेतली.

13.  नेत्यांनी अंतराळ क्षेत्रातील, विशेषत: सहकार्यासाठी संयुक्त कृती आराखड्याच्या अंमलबजावणीतील प्रगतीचे स्वागत केले आणि STEM अभ्यासशाखांवर भर देऊन शैक्षणिक क्षेत्रातील वाढत्या सहयोगाबद्दल समाधान व्यक्त केले.

14.  महामहिम भूतानच्या राजांच्या भेटीमुळे दोन्ही देशांमधील नियमित उच्चस्तरीय देवाणघेवाणीची प्रदीर्घ परंपरा बळकट झाली आहे. महामहिमांच्या भेटीने दोन्ही देशांना द्विपक्षीय सहकार्याच्या संपूर्ण पैलूंचा आढावा घेण्याची आणि भारत आणि भूतानमधील घनिष्ठ द्विपक्षीय भागीदारी पुढे नेण्याची संधी दिली.

**नवी दिल्ली**

**05 डिसेंबर 2024**